


दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०१ ● अंक : ३०९ ● गुरुवार, दि. ०५ सप्टेंबर २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये

● Volum : 1 ● Issue : 309 ● Thursday, 5 September 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-



# नक्की काय सिद्ध करायचे आहे?



बॉलीवूडने कायमच secularism च्या नावाखाली हिंदूंना एका negative पद्धतीने चित्रित केले आहे. मग ते हिंदू देवतांवर व्यंग चित्रित करून असो किंवा एकंदरीतच हिंदू धर्माचे विकृतीकरण करणे असो...याच्या उलट मात्र मुसलमानांना नेहमी 'अच्छा और इमानदार' मुस्लिम म्हणून प्रेक्षकांना दाखवले आहे, मग भलेही दाऊदने 1993 मध्ये मुंबईत बॉम्ब ब्लास्ट करून अनेक निरपराधी लोकांना मारलेलं असताना सुद्धा बॉलीवूड साठी दाऊद जवळपास एक सेलेब्रिटी आहे. ज्याच्यावर 'परिस्थिति'ने घाला घातल्यामुळे अंडरवर्ल्डचा गुंड आणि पुढे दहशतवादी बनण्याची वेळ आली. सध्या ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर 29 ऑगस्टला प्रदर्शित झालेल्या 'IC 814: द कंदहार हायजॅक' ही वेबसीरिजसुद्धा याच कारणामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. हा वाद नेमका आहे तरी काय ? आणि खरंच या वेबसीरिजच्या माध्यमातून दहशतवादासारख्या गंभीर विषयाचे मानवीकरण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे का? आणि जर असे असेल तर .....तसे का? कसे आजपर्यंत बॉलीवूड व आता नेटफ्लिक्स 'Hinduphobic Content" ला वाव देत आले आहेत.

काय होत ' कंदहार हायजॅक' 'IC 814: द कंधार हायजॅक' ही सीरिज खऱ्या घटनेवर आधारीत आहे. वाजपेयी सरकारवर नामुष्की ! फ्लाईट IC-814 हायजॅक हे दहशतवाद्यांनी भारतात केलेले सर्वात वाईट दहशतवादी कृत्य होतं असं म्हटलं जातं. 24 डिसेंबर 1999 मध्ये पाच दहशतवाद्यांनी भारताचे विमान हायजॅक केले होते. जवळपास 1 आठवडा विमान अपहरणकर्त्यांच्या ताब्यात होते. त्यानंतर तीन दहशतवाद्यांना भारतीय तुरुंगातून मुक्त करण्याच्या बदल्यात 179 प्रवाशांची सुटका करण्यात आली होती. यात एका प्रवाशाचा मृत्यूदेखील झाला होता.

याच घटनेवर आधारित ही वेबसिरीज, अनुभव सिन्हा जे 'Hinduphobic' सिनेमा आणि वेबसेरीज बनवण्यासाठी liberals मध्ये प्रसिद्ध आहे, यांनी दिग्दर्शित केली आहे. आता अनुभव यांचे दिग्दर्शन म्हणजे या मध्ये सुद्धा भरभरून Hinduphobic content तर असणारच, नाही तर मग "अब्बाजान दुबईसे पैसे कैसे भेजेंगे !"

द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सिन्हा यांनी दावा केला, "मला वाटले की मला या घटनेबद्दल माहिती आहे आणि मग मी स्क्रिप्ट वाचली. मला ते आवडले नाही असे मी म्हणू नये, परंतु मला वाटले की आपण यासह आणखी काही केले पाहिजे."यामुळे, वादग्रस्त चित्रपट निर्मात्याने 'अपहरणाचे 360 अंश दृश्य' देण्याचा निर्णय घेतला.

पण अंदाज लावा की, प्रोपगंडा पेडलर अनुभव सिन्हा यांनी काय दाखवले आहे? 2016 साली जर कसाब जिवंत पकडला गेला नसता तर लेफ्टीस्ट लॉबीने मिळून त्याला हिंदू दहशतवादी म्हणून घोषित केलेच असते. काही बुद्धिजीवींनी तर त्याच्यावरती पुस्तक पण काढले होते.

तसाच काहीसा प्रोपगंडा, अनुभव सिन्हाने वेबसिरीजमध्ये चालवत त्या मधून ISIS चा रोल white wash केला. हे विमान हायजॅक करणाऱ्या दहशतवाद्यांची नावं इब्राहिम अतहर, शाहिद अख्तर सैयद, सनी अहमद काजी, जहूर मिस्त्री आणि शाकिर अशी होती. हे सगळे पाकिस्तानातील एका दहशतवादी गटाशी जोडलेले होते हे सिद्ध झालं होतं; मात्र सीरिजमध्ये मुसलमान असलेल्या या दहशतवाद्यांची नावे बदलून हिंदू करण्यात आली आणि शेफ, बर्गर, डॉक्टर, शंकर, भोला अशी दाखवण्यात आली आहेत.

आता जेव्हा हा मुद्दा समोर आला तेव्हा बऱ्याच बुद्धिजीवींनी, " हे तर गव्हर्नमेंट रेकार्डमध्ये सुद्धा मेंशन केले आहे, असे सांगून ही सिरीज हिंदूविरोधी आहे या आरोपाला खूप काळजीपूर्वक खोडून टाकण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्यासाठी हे जरी खरे असले कि दहशवाद्यांनी तेव्हा शेफ, बर्गर, डॉक्टर, शंकर, भोला या हिंदू नावांचा उपयोग केला, परंतु त्या वेबसिरीजमध्ये पुढे कुठेही हे दाखवण्यात आले नाही की त्यांची खरी नावे काय होती आणि ते कुठून आले होते. जाणीवपूर्वक हिंदू नावाने दहशतवाद्यांची मुस्लिम ओळख लपवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

The show does not even tell us that these men were Pakistanis and that, a couple of days into the hijack, Indian intelligence agencies had identified them as Pakistani operatives and even knew which parts of Pakistan they came from. Instead, the show seeks vaguely and unconvincingly to link the hijackers to Afghanistan and even to Al Qaeda, suggesting that the hijacking was part of some grand plan hatched by Osama bin Laden and that, if ISI was involved, then it was in a very junior position.

वेबसिरीजमध्ये कुठेही असे दाखवण्याचा प्रयत्न केला गेला नाही कि त्यामधील एक दहशतदवादी मसूद अझरचा भाऊ होता आणि ते मिशन त्याच्याच सुटकेसाठी अंमलात आणले होते.असे का केले गेले, हे सांगायची गरज खर तर नाहीये.

मध्यंतरी नसीरुद्दीन शाह यांचा एक व्हिडीओ viral झाला होता, ज्यामध्ये त्यांनी एका न्युज इंटरव्यू दरम्यान त्यांची नाराजीसुद्धा जाहीर केली होती कि त्यांच्या एका मूवी 'वेन्सडे' मध्ये 4 दहशदवाद्यांना मुस्लिम का दाखवले गेले आहे. म्हणजे त्यांना प्रॉब्लेम हा आहे कि जे खरे आहे ते दाखवले.

शाह यांना एक प्रश्न विचारावासा वाटतो कि त्यांनी एक घटना सांगावी जिथे दहशतवाद्याने "अल्लाह हू अकबर म्हटल्याशिवाय " स्फोट घडवला असेल.

दहशतवाद्यांची प्रतिमा सुधारण्याचे काम करण्यात आले आहे. आता अनुभव यांचे इस्लामवर प्रेमच इतके जास्त आहे, की त्यांना त्या दहशतवाद्यांमध्ये माणूस दिसला. किती लोकांना माहिती असेल कल्पना नाही, पण या दहशदवाद्यांची क्रूरता एवढी होती की त्यांनी बऱ्याच लोकांना बेदम मारले होते आणि त्यामधून ज्याचा मृत्यू झाला अशा माणसाला विमानातून खाली फेकून दिले होते. ही दहशत लपवून त्यांनी दहशतवाद्यांचे मानवीकरण दाखवण्याचा निर्णय घेतला. यांचे हे प्रेम बघता खरंच वाटते कि प्रेम आंधळे असते.

अनुभव यांच्या मते तर दहशदवाद्यांनी pilot आणि passengers यांची माफी सुद्धा मागितली. एवढाच नाही तर passengers दहशतवाद्यांना सोबत अंताक्षरी खेळत होते. एवढेच नाही तर अनुभव यांनी असे सांगितले कि "अपहरणकर्त्याने कॅप्टनला तुम्हाला कधी काही मदत हवी असल्यास मला कळवा असे सांगितले होते" ही सिरीज बघून एवढे तरी नक्की होते की ही सिरीज फक्त हिंदू फोबिक नव्हती.

The deliberate evasions and inventions turn the whole show into an expensive PR job for the ISI. Why did Netflix allow a whitewash job for the ISI to get made?




राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार
निष्ठेची ढाल,
स्वाभिमानाची तलवार...
काकासाहेब
चव्हाण..
नेतृत्व झुंजार !
राष्ट्रवादी काँग्रेस
शरदचंद्र पक्षाचे झुंजार नेते,
भावी आमदार
काकासाहेब
चव्हाण
आपणास वाढदिवसाच्या
खूप खूप शुभेच्छा.

# शिवरायांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या हातात महाराष्ट्र नको



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

साठ वर्षांपूर्वी यशवंतराव चव्हाण यांनी गेटवे ऑफ इंडियासमोर छत्रपती शिवरायांचा पुतळा उभा केला.

समुद्राजवळ आणि अखंड वारा असतानाही आजपर्यंत कधी या पुतळ्याला धक्का बसला नाही. पण मालवणात काही महिन्यांपूर्वी पंतप्रधानांच्या हस्ते अनावरण करण्यात आलेला छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळल्याचे चित्र आज पाहायला लागत आहे.

कारण या पुतळ्याच्या निर्मितीमध्येच भ्रष्टाचार झाला आहे. महाराजांच्या पुतळ्यातही भ्रष्टाचार करण्याची बेशरमपणाची भूमिका घेणाऱ्यांच्या हातात महाराष्ट्र द्यायचा नाही. यांचा निकाल तुम्हाला आम्हाला लावावा लागेल, असा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला. त्यासाठी स्वच्छ, चारित्र्यसंपन्न आणि लोकांच्या हिताची जपणूक करणाऱ्या नेतृत्वाची फळी महाराष्ट्रात निर्माण करण्याचा कार्यक्रम हातात घेतला आहे, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील सत्ता बदलल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. हे परिवर्तन महाराष्ट्रात करायचे आहे. महाराष्ट्र प्रगत आणि यशस्वी करायचा आहे. त्यासाठी तुम्ही आणि आपण प्रयत्नांची पराकाष्टा करू, असे पवार म्हणाले.

कागलमधील एका व्यक्तीला सर्व काही दिले; पण संकटात साथ द्यायची जबाबदारी असताना ते सोडून गेले. सात-आठ महिन्यांपूर्वी केंद्रातील सरकारमधील काही संस्थांनी ‘ईडी’सारख्या कारवाईतून चौकशी करून पुटुंबीयांना अस्वस्थ केले. त्यामुळे त्यांच्या पुटुंबातील महिलांनी ‘आम्हाला गोळ्या घाला’ असे म्हणत संताप व्यक्त केला होता.

आपल्या पुटुंबाला यातना देणाऱ्या घटकांच्या दरवाजातच लाचारासारखे ते जाऊन बसले. हा काही कागलचा इतिहास नाही. कागल बाकी काही सहन करेल; पण लाचारी स्वीकारणार नाही. ज्यांनी स्वीकारली त्यांना धडा शिकवायचे काम कागलची जनता करेल, असा इशारा शरद पवार यांनी मुश्रीफ यांचे नाव न घेता दिला.

## समरजितसिंह घाटगे राष्ट्रवादीत

‘कोल्हापुरातील राजकारणाचे विद्यापीठ’, अशी ओळख असलेल्या कागलच्या गैबी चौकात सायंकाळी भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी झालेल्या सभेत शरद पवार यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या चुकीच्या भूमिकेवर कडाडून हल्ला चढविला. तसेच कागलमधून ज्यांना सर्वकाही दिले ते मंत्री मुश्रीफ हे अजित पवार गटात गेल्याने त्यांचा नामोल्लेख टाळून शरद पवार यांनी चांगलाच समाचार घेतला.

## छत्रपती शिवाजी महाराजांनी एकदा नव्हे, दोनदा सुरतेवर स्वारी केली होती; शरद पवार यांनी व्यक्त केले मत

कोल्हापूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सूरतेच्या स्वारीबाबत आपले मत स्पष्टपणे मांडले. काहीजण छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरतेवर स्वारी केली नाही. तसेच सुरतेची लूट केली नाही, असा दावा करत आहे. काँग्रेस आणि इतर पक्षाकडून चुकीचा इतिहास पसरवण्यात येत आहे, असा आरोपही ते करत आहे. मात्र, इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांनी आणि यातील तज्ज्ञांनी याबाबत मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. इतिहासकार छत्रपती शिवरायांनी सूरतेवर स्वारी केली होती, असे मत स्पष्टपणे मांडत आहेत. छत्रपती शिवरायांनी एकदा नव्हे, दोनदा सुरतेवर स्वारी केली होती. मात्र, त्या स्वारीचा उद्देश वेगळा होता, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले. इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत,जयसिंगराव पवार यांच्यासह अनेकांनी या स्वारीबाबत मत व्यक्त केलं आहे. कोणीही जनतेसमोर चुकीचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न करू नये, तरुणी पिढीपर्यंत चुकीची माहिती पसरवू नये, असेही शरद पवार म्हणाले. राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळला. हा पुतळा जोरदार वाऱ्यांमुळे कोसळला, असे सांगण्यात येते. मात्र, राज्यात अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे सुमद्रकिनारी अनेक वर्षे उभे आहेत. त्याठिकाणीही वाऱ्यांचा वेग असाच असतो. मात्र, या पुतळयाच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्यानेच तो पडला, तसेच पुतळा उभारण्यापूर्वी जो अभ्यास करण्याची गरज होती, तो करण्यात आला नाही, असे दिसून येते, असेही शरद पवार म्हणाले. तसेच ज्यांना काम दिले, ते अनुभवी नव्हते, त्यांना एवढ्या मोठ्या कामाचा अनुभव नव्हता, त्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचे दिसून येते, असेही ते म्हणाले. राज्यात कायदा सुव्यवस्था ढासळत आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यावरून गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांचा प्रशासनावर वचक नसल्याचे दिसून येते. राज्यात महिला अत्याचाराच्या घडणाऱ्या घटना संतपाजनक आहेत, असेही ते म्हणाले. बदलापूर घटनेबाबत बाहेरून आलेल्या माणसांनी ठरवून आंदोलन केले, असे सरकारकडून सांगण्यात आले. मात्र, जनतेने आपला रोष व्यक्त करणे, हा लोकशाहीतील जनतेचा अधिकार आहे. ज्यांनी आपला निषेध व्यक्त केला, त्यांच्यावर खटले भरले, हे अयोग्य आहे. तेथील स्थानिक जनतेची उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. यात कोणतेही राजकारण नाही. बदलापूरची घटना आणि राजकोट किल्ल्यावरील घटनेविरोधात जनतेने प्रतिक्रिया दिली, त्यात अयोग्य काहीही नाही, असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

# सुनील टिंगरेना तिकीट दिल्यास भाजप काम करणार नाही

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वडगाव शेरी - लोकसभा निवडणुकीत आमदार सुनील टिंगरे यांनी भाजपचे काम केले नसल्यामुळे विधानसभा निवडणुकीत आम्हीही त्यांचे काम करणार नाही, अशी भूमिका वडगाव शेरीतील भाजप पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांच्यासमोर मांडली. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत वडगाव शेरी महायुतीतील संघर्ष अधिक टोकदार होण्याची चिन्हे आहेत.



भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी वडगाव शेरी येथील भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीवळी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, जगदीश मुळीक, स्थानिक माजी नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भाजप पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीच्या आमदारांविरोधात आपली खदखद व्यक्त केली.

काही दिवसांपूर्वीच वडगाव शेरीतील विकास कामांच्या उद्घाटन प्रसंगी श्रेयवाद उफाळून आला होता. आमदार सुनील टिंगरे युतीधर्म पाळत नसल्याचा थेट आरोप येथील माजी आमदार जगदीश मुळीक यांनी त्यावेळी केला होता. त्याच्या दोन पावले पुढे जाऊन भाजप पदाधिकाऱ्यांनी आज टिंगरे यांच्यावर आरोप केले आणि तसे लेखी पत्र पंकजा मुंडे यांना दिले. तसेच वडगाव शेरी मतदारसंघ भाजपला द्यावा, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी मुंडे यांच्याकडे केली.

लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी संविधान बदलाचे फेक नेरिटीव्ह पसरवून काही प्रमाणात यश मिळवले. आता मात्र जनता खोट्या प्रचाराला बळी पडणार नाही, असा विश्वास कार्यकर्त्यांना देत लाडकी बहीण, तसेच युती सरकारच्या इतर योजना जनतेपर्यंत जाऊन पोहोचवा असा सल्ला मुंडे यांनी बैठकीतील पदाधिकाऱ्यांना दिला.


त्यानंतर बोलताना मुंडे म्हणाल्या, आयुष्यभर ज्या राष्ट्रवादी काँग्रेसला विरोधक मानले त्यांना सोबत घ्यावे लागले. सत्तेसाठी असे तह करावे लागतात. वडगाव शेरीत भाजपची मोठी ताकद असल्यामुळे हा मतदारसंघ भाजपला देण्याची पदाधिकाऱ्यानी केलेली मागणी नैसर्गिक आहे. परंतु कोणती जागा कोणाला सोडायची याचा निर्णय वरिष्ठ घेतील.

## चर्चा बापू पठारेंच्या दांडीची....

सध्या भाजपमध्ये असलेले माजी आमदार बापू पठारे हे विधानसभा निवडणुकीत 'तुतारी' हातात घेणार असल्याची चर्चा आहे. नेमके आज पंकजा मुंडे यांनी घेतलेल्या महत्वाच्या बैठकीला बापू पठारे यांनी दांडी मारल्याने या चर्चेला बळ मिळाले. याबाबत विचारल्यावर पुढच्या बैठकीला पठारे हजर राहतील, असे बोलून मुंडे यांनी वेळ मारून नेली.











खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार साहेब पक्षाचे अध्यक्ष
5 सप्टेंबर
मा.श्री.सोपान उर्फ काकासाहेब चव्हाण
वाढदिवस अभिष्टचिंतन..!
शुभेच्छुक: शिवशंकर मित्र मंडळ


आभाळाएवढं कर्तृत्व
निःस्वार्थ दातृत्व
संयमी नेतृत्व
खडकवासल्याचे भावी आमदार, आदर्श नेते
माननीय श्री काकासाहेब चव्हाण
यांना वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक:
अमरज्योत मित्र मंडळ व साईराज मित्र मंडळ


जिथे ओढवतो प्रसंग बाका
तिथे उभे राहतात काका
खडकवासल्याच्या जनतेसाठी
अविरत झटणारं नेतृत्व,
आदरणीय
काकासाहेब चव्हाण
यांना वाढदिवसाच्या
उदंड शुभेच्छा.
5 सप्टेंबर
शुभेच्छुक:
श्री संत सावतामाळी मित्र मंडळ
अखिल ऋतुनगरी मित्र मंडळ